# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०५/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

### सावनेर येथे गांजा विक्री करणाऱ्यावर सावनेर पोलीसांची धडक कारवाई

आज दिनांक २३/०५/२०२४ रोजी पो.स्टे. सावनेर हद्दीतील माहेश्वरी लेआउट जिवतोडे हॉस्पीटल जवळ राहणारा ओम जगदीश जनरल स्टोर्स चालक चिन्नोरकर हा आपले दुकानात गांजा बाळगतो व ग्राहकांना विक्री करतो अशी विश्वसनिय माहिती सावनेर पोलीसांना मिळाली असता, सावनेर पोलीसांनी लगेच घटनेचे गांभिर्य ओळखुन, माहिती वरिष्ठांना दिली असता, वरिष्ठांनी लागलीच रेड करण्याचे आदेश दिले. त्यावरुन पोलीस स्टॉफनी सदर ठिकाणी जावुन रेड केला असता, त्याचे ओम जगदीश जनरल स्टोर्स येथे लाकडी रॅकच्या खालच्या कप्प्यामध्ये एका प्लॅस्टीक चुंगळी मध्ये गुंगीकारक वनस्पती अंमली पदार्थ गांजा एकुण ०१ किलो ९२६ ग्रॅम वजन किंमती २०,०००/— रुपयाचा माल मिळुन आल्याने, सपोनि अनिल राऊत यांचे तक्रारी वरुन आरोपी नामे —जगदीश लखनलालजी चिन्नोरकर वय ६२ वर्ष रा. सावनेर यांचे विरुध्द पोस्टेला अपराध क्रमांक ५०६/२४ कलम २०, २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपीचा दिनांक २८/०५/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला असुन, पुढील सखोल तपास सपोनि मंगला मोकासे या करीत आहेत.

सदरची संपुर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधीक्षक सावनेर विभाग श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर, सहा. पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोउपनि व्यंकटेश दोनोडे, अरुण राठोड, पोहवा अनुल खोडणकर, नंदकिशोर मेश्राम, अविनाश बाहेकर, संगिता कोवे, सचिन लोणारे, भावेश शेंन्डे, नितेश पुसाम, चापोहवा प्रितम पवार सर्व यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर